'सुबुद्धतेची उणीव भरून काढील!'

जयंत नारळीकर

दर वर्षी पृथ्वीवर कुठे ना कुठे तरी एखादी अपरिचित उडती वस्तू आकाशात आढळल्याचे वृत्त वाचायला मिळते. या घटना वेगवेगळ्या स्वरूपाच्या असतात. वैमानिकांना आकाशात आपला पाठलाग करीत येणारी याने दिसली आहेत. पादचाऱ्यांना आभाळात चमकदार वस्तू उडताना, कधी जमिनीवर उतरताना नजरेस पडल्या आहेत. आणि काहींनी म्हणे त्यातून विचित्र जीव बाहेर येताना पाहिले आहेत. हेही काहीच नव्हे. काही मोजक्या भाग्यवंतांना तर अशा यानातून सैरही करायला मिळाली आहे !

हा सर्व काय प्रकार आहे ? सर्वसामान्य माणसाला अशा प्रकारची अतिरंजित वर्णने वाचून असे वाटणे साहजिकच आहे की या घटना अनाकलनीय असून त्यांच्या मुळाशी पृथ्वीबाहेरच्या, मानवापेक्षा श्रेष्ठ अशा शक्ती आहेत. अशा शक्ती पृथ्वीवर टेहळणी करायच्या उद्देशाने आपली हेरयाने पाठवीत असाव्यात. अशा संभाव्य धोक्यांची अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राला कल्पना असून देखील मुद्दाम अशा गोष्टींची वाच्यता केली जात नसावी. आणि काही झाले तरी पृथ्वीतलावर आणि आसपास जे काही घडत आहे ते विज्ञानाच्या आकलनापलीकडले आहे. सुशिक्षितांमध्येसुद्धा अशा कल्पना प्रचलित दिसतात. 'बर्म्युडा त्रिकोण', 'देवांचे रथ' इत्यादी अतिरंजित पाश्चात्य पुस्तकांनी असे समज सामान्यजनांत रूढ करण्यात पुष्कळ हातभार लावला आहे. शिवाय ज्याप्रमाणे ठराविक चाकोरीतले सरळसोट जीवन जगणाऱ्याला चमत्कारांविषयी आकर्षण आणि कुतूहल वाटते त्याप्रमाणेच रोज रोज पृथ्वीसंबंधीच्याच रटाळ बातम्या वाचून कंटाळलेल्यांना ह्या 'परलोका'-बद्दलच्या बातम्या आवडल्यास नवल नाही.

अनाकलनीय नव्हे

अशा प्रकारांबद्दल आजच्या विज्ञानयुगात वैज्ञानिकांचे मत काय आहे ? जेथे जेथे वैज्ञानिकांनी 'चमत्कारां'ची शास्त्रीय छाननी केली आहे तेथे तेथे त्यांना चमत्कृतिपूर्ण काहीच आढळले नाही. मानवनिर्मित चमत्कार म्हणजे तर हातचलाखी हे वेळोवेळी दिसून आले आहे. मग ह्या अपरिचित उडत्या वस्तू म्हणजे काय प्रकार आहे ? आजवर अशा शेकडो वस्तूंची शास्त्रीय छाननी झालेली आहे, आणि काही अपवाद वगळता त्यांत काहीही अनाकलनीय नाही हे सिद्ध झाले आहे.

मग अपवादांचे काय ? त्यामागे खरोखरच काही रहस्य आहे का ? असे प्रश्न करणाऱ्यांनी फिलिप क्लासचे 'यू. एफ. ओ.'ज एक्सप्लेन्ड' (अपरिचित उडत्या वस्तूंची कारणमीमांसा) हे पुस्तक अवश्य वाचावे. प्रथम १९७४ साली प्रसिद्ध झालेल्या ह्या पुस्तकाच्या नंतर अनेक आवृत्त्या निघाल्या. त्यांत १९७४ पर्यन्तच्या काही अपरिचित उडत्या वस्तूंची (यू. एफ. ओ. म्हणजे अनआयडेंटीफाइड फ्लाइंग ऑब्जेक्ट) शास्त्रीय छाननी केली आहे. 'जेथे सुबुद्धतेची उणीव आहे अशा क्षेत्रात ती उणीव हे पुस्तक भरून काढील' अशा शब्दात प्रख्यात विज्ञानकथालेखक आर्थर क्लार्क यांनी त्याचे स्वागत केले. पुस्तक वाचल्यावर (आणि अनेक वर्षांनी यंदाच तो योग आला !) मला क्लार्क यांच्या वरील शेऱ्याची यथार्थता पटते.

पुस्तकाच्या ३१ प्रकरणांपैकी शेवटचे वगळता बाकीच्या प्रकरणांत प्रसिद्धी पावलेल्या अनेक अशा घटनांची शास्त्रीय तपासणी आहे. ती पाहता अपरिचित उडत्या वस्तुंमागे अनाकलनीय काही नाही हे पटते. जागेच्या अभावी इथे सविस्तर माहिती देता येत नाही. पण अशा घटनांमागे काय काय कारणे असू शकतात याची थोडक्यात चर्चा करतो.

मग कबूल करवत नाही

काही घटना गंमत म्हणून शाळकरी मुलांच्या खोडकर प्रयत्नांतून निर्माण झाल्या. काही प्रकार ते पाहणाऱ्यांच्या दृष्टिभ्रमातून पुढे आले तर काही प्रसंगी मुद्दाम खोटी साक्ष दिली गेली. सामान्य माणसाचा फोटोवर विश्वास बसतो, म्हणून फोटोंच्या बाबतीत फसवाफसवीचे प्रकार झाले आहेत. पण आधुनिक परीक्षण यंत्रांद्वारे हे प्रकार कसे उघडकीला येतात हेही लेखकाने दाखवले आहे. अनेक वेळा अशा खोटेपणाच्या वेगवेगळ्या प्रकारांतून निर्माण झालेल्या घटना इतक्या लवकर प्रसिद्धी पावतात की त्यांच्या जनकांना त्या खोट्या होत्या हे शेवटी कबूल करवत नाही. काही वेळा अशा प्रसिद्धीमुळे एखादे लहान गाव 'टूरिस्ट ट्रेड' वाढल्यामुळे भरभराटीस येण्याची शक्यता असते म्हणून त्या गावच्या गण्यमान्य व्यक्तीसुद्धा हा खोटेपणा उचलून धरतात. हायनेकसारखे प्रख्यात शास्त्रज्ञदेखील फसल्याची उदाहरणे आहेत.

मात्र सर्वच प्रकार खोटेपणाचे, फसवाफसवीचे नसतात. वातावरणात होणारे बदल, पृथ्वीवरच्याच प्रकाशझोतांची किमया किंवा मानवनिर्मित याने, बॉल लाइटनिंगचे प्रकार, उगवणारे किंवा अस्ताला जाणारे ग्रह, इत्यादी अनेक मार्गांनी अपरिचित उडत्या वस्तूंचा भास होऊ शकतो हे ह्या पुस्तकातल्या उदाहरणांवरून दिसून येते.

तपासणीचे प्रकार

या प्रकरणांचा छडा लावण्यासाठी लेखकाने अनेक मार्ग अवलंबिले. एखाद्या घटनेचे वृत्तपत्रात वर्णन वाचले की घटनास्थळी जाऊन तपासणी करणे, संबंधित व्यक्तींशी बोलणे, शक्य झाल्यास त्याची उलटतपासणी करणे, फोटो घेणे व त्यांनी घेतलेल्या फोटोंची तपासणी करणे, हवामान खात्याच्या नोंदी पाहणे, जरूर असली तर रडारच्या नोंदी पाहणे, घटनास्थळी सापडलेल्या पदार्थांच्या नमुन्यांची रासायनिक तपासणी करणे आणि सर्वांत महत्त्वाचा मार्ग म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन वापरणे – या सर्वांचे नमुने पाहायला मिळतात. या वस्तुंमागे, घटनांमागे, अनाकलनीय काहीच नाही हे दाखवण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

इतके करूनही अपरिचित उडत्या वस्तूंचा इतका सुळसुळाट का ? यामागची कारणमीमांसा करण्यासाठी लेखकाने काही 'तत्त्वे' प्रतिपादन केली आहेत. मनुष्यस्वभाव, समाजाचा प्रतिसाद आणि नैसर्गिक घटना यांचा समन्वय ह्या तत्त्वांत आहे. बहुतेक यू. एफ. ओ. घटनांमागे या तत्त्वांपैकी काही दिसून येतात. उदाहरणार्थ तत्त्व क्रमांक ४ पाहा : **"अपरिचित उडती वस्तू दिसली की त्याला वृत्तपत्रे आणि इतर प्रचारमाध्यमांत पुष्कळ प्रसिद्धी मिळते. परन्तु त्या वस्तूची ओळख पटली आणि त्यांत अनाकलनीय काही नाही असे सिद्ध झाले, की त्या वृत्ताला फारशी प्रसिद्धी मिळत नाही."**

शेवटच्या प्रकरणात लेखकाने पूर्वी लावलेल्या एका पैजेचा पुनरुच्चार केला आहे. तुम्हाला जर अशी एखादी घटना सापडली की जिच्यामुळे पृथ्वीवर परकीय अंतराळयान उतरले असे सिद्ध होईल आणि जर हा दावा अमेरिकेच्या राष्ट्रीय वैज्ञानिक संस्थेने मान्य केला तर लेखक तुम्हाला १० हजार डॉलर देईल. मात्र ही पैज मारणाऱ्याला पैजेचा विडा उचलल्यापासून दावा सिद्ध होईपर्यन्त आणि जास्तीत जास्त दहा वर्षे कालापर्यन्त (जो कालखंड कमी असेल त्यानुसार) लेखकाकडे दरवर्षी १ हजार डॉलर पोचवावे लागतील !

अजून फिलिप क्लास आपली पैज हरलेला नाही. बोला, तुम्ही त्याचे आव्हान स्वीकारता ?

(UFOs Explained ; Philip J. Klass, Vintage Books, Random House, New York या १९७९ साली वाचलेल्या आणि आवडलेल्या पुस्तकावर लेख).